(ESTD. 1965)
Gondia Education Society's
**SETH NARSINGDAS MOR COLLEGE OF ARTS & COMMERCE &
SMT. G. D. SARAF SCIENCE COLLEGE**
Tumsar-441912 (M.S.) Dist. Bhandara
Ph. No. Office : (07183) 233300 Res. : (07183) 233301
Email - principalsnmorcollege@rediffmail.com, snmorcollege1965@gmail.com website : snmorcollege.org.in

Ref. No. : SNMC/2023-24 Date : 07.04.2023

# आदिवासी जनजातींच्या नायकांनी घडवला भारताचा इतिहास

"निरनिराळया काळामध्ये आदिवासी जनजातींच्या नायकांनी आपले बलिदान देऊन भारताचा इतिहास घडवला आहे. त्यांच्या शौर्याची गाथा प्रस्थापित समाजाने लिहिली नाही. तरी सुद्धा आजच्या काळात हा खरा इतिहास समाजासमोर येत आहे. आदिवासी जनजातींच्या नायकांचा हा इतिहास संपूर्ण देशासाठी गौरवास्पद व अभिमानास्पद आहे." असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील इतिहास विभाग प्रमुख डॉ. श्यामराव कोरेटी यांनी केले.

गोंदिया शिक्षण संस्थेद्वारा संचालित सेठ नरसिंगदास मोर कला, वाणिज्य व श्रीमती गोदावरीदेवी सराफ विज्ञान महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागातर्फे राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाच्या निर्देशानुसार 'स्वातंत्र्य संग्रामातील जनजातींच्या नायकांचे योगदान' या विषयावर कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चेतनकुमार मसराम हे होते. तर कार्यक्रमाचे मुख्य वक्ते म्हणून डॉ. श्यामराव कोरेटी हे उपस्थित होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणून श्री. अनिल मरसकोल्हे हे उपस्थित होते. आपल्या भाषणामध्ये डॉ. कोरेटी म्हणाले की, भारताच्या जडणघडणीमध्ये आदिवासी समूहाचे योगदान मोठे आहे. भारतातील शहरांची रचना, किल्ले, स्थापत्यशास्त्र, एवढेच नव्हे तर जीवनशैली विकसित करण्यामध्ये आदिवासी जनजातींचा मोठा वाटा आहे. आदिवासी जनजाती या निसर्गपूजक असून पर्यावरण संवर्धन करणा-या आहेत.

स्वातंत्र्य काळामध्ये धरती आबा बिरसा मुंडा, तिलका मांझी, मुंडल सिंह, तिरोत सिंग, रघुनाथ शहा, बाबुराव शेडमाके अशा असंख्य वीरांनी आपले बलिदान देउन राष्ट्रनिर्माणाचे कार्य केले आहे. त्यामुळे संपूर्ण देशवासियांना त्यांचा अभिमान असायला हवा. या कार्यक्रमाप्रसंगी NCST च्या एका फिल्मचे प्रदर्शन करण्यात आले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चेतनकुमार मसराम म्हणाले की, आदिवासी जनजातींच्या तरुणांनी आपल्या गौरवशाली इतिहासातून प्रेरणा घ्यायला हवी. तसेच आजच्या काळात क्रांतीची दिशा काय राहील? याचा शोध घ्यायला हवा. यासाठी अस्मिता, अस्तित्व आणि विकास या तीन महत्वपूर्ण घटकांवर लक्ष केंद्रित करायला हवे.

या कार्यक्रमास तुमसरातील आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृहाचे गृहपाल श्री. घाटे, आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृहाच्या गृहपाल कु. कोकाटे मॅडम तसेच संशोधक विद्यार्थी प्रा. अशोक नेताम, श्री. संदीप काळे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. राजेंद्र बेलोकार यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रेणुकादास उबाळे यांनी केले तर प्रा. लक्ष्मण पेटकुले यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Ref. No. : SNMC/2023-24 Date : 07.04.2023






(ESTD. 1965)

Gondia Education Society's

# SETH NARSINGDAS MOR COLLEGE OF ARTS & COMMERCE & SMT. G. D. SARAF SCIENCE COLLEGE


Tumsar-441912 (M.S.) Dist. Bhandara

Ph. No. Office : (07183) 233300 Res. : (07183) 233301

Email - principalsnmorcollege@rediffmail.com, snmorcollege1965@gmail.com website : snmorcollege.org.in


Ref. No. : SNMC/2023-24 Date : 07.04.2023




